**Nehru Centre**
आयोजित

# कार्यशाळा
# लावणी माझी सखी



**प्रात्यक्षिके व मार्गदर्शन**
**(पारंपारिक लावणी कार्यशाळा)**
नामांकित लावणी प्रशिक्षक - तज्ञा मार्फत

'लावणी माझी सखी' कार्यशाळा शास्त्रीय वादन, गायन, नृत्य याचे उगमस्थान म्हणून लोकसंगीत आणि लोककलेकडे पाहिले जाते. काही शतकापूर्वी आनंद व्यक्त करण्यासाठी सामूहिक नृत्य कलाप्रकार उदयाला आला. निसर्गात उपलब्ध असलेले साहित्य वाद्य म्हणून वापरले गेले आणि त्यातून आनंद मिळतोय म्हटल्यानंतर दिवसेंदिवस या कलेमध्ये प्रगती व्हायला लागली. त्यात आकृतीबंध, बंदिस्त असे काही असायला हवे या दृष्टीने मर्यादित जागेत कार्यक्रमाची निर्मिती झाली. त्यात 'तमाशा' हा कला प्रकार पुढे आला. 'तमाशा' संस्कृतीने अनेक कार्यक्रमाला जन्म दिला. **'लावणी'** हा कलाप्रकार त्यापैकी एक आहे. या लावणीला अनेक शतकाचा इतिहास आहे. लावणीला राजे, महाराजे यांनी आश्रय दिला त्यातून विविधता जन्माला आली. एकट्या लावणीमध्ये अनेक कला प्रकार आहेत. हे जरी खरे असले तरी मधल्या काळामध्ये या कलेचा आनंद पुरुषानेच घ्यायला हवा असे काहीसे वातावरण निर्माण करण्यात आले होते. या लावणी विषयी समज गैरसमज पसरवले गेले त्यामुळे ही लोककला ठराविक समाजाची झाली होती. आता काळ बदललेला आहे. या लावणीला प्रतिष्ठा मिळालेली आहे. लोककलेची राणी म्हणून या लावणीला मान्यता आहे. हि लावणी फक्त महाराष्ट्रातच राहिली नाही तर भारताबरोबर परदेशातही, प्रदेशातही विस्तारलेली आहे. अनेक महोत्सवात लावणीचे कार्यक्रम व्हायला हवेत असा आग्रह जागतिक पातळीवरच्या सांस्कृतिक चळवळीमध्ये होताना दिसतो आहे. त्यामुळे शास्त्रीय नृत्या बरोबर आता लावणीला सुद्धा मान्यता मिळालेली आहे. कितीतरी शास्त्रीय नृत्यांगना विविध भारतीय शास्त्रीय नृत्याचे शिक्षण देताना या लावणीचे ही शिक्षण देणे सुरु केले आहे. स्वप्न बाळगून असलेल्या युवती बरोबर उच्च शिक्षित, सुसंस्कृत घरातल्या स्त्रिया सुद्धा लावणी आत्मसात करायला लागल्या आहेत. इतकेच काय तर ही लावणी फक्त स्त्रियांची मक्तेदारी न राहता पुरुषवर्ग सुद्धा मोठ्या संख्येने ही लावणी आत्मसात करतो आहे. विशेष म्हणजे महासोहळ्यात सादर करण्यासाठी पुढाकारही घेतो. पुरुषांबरोबर आता लावणी पाहणाऱ्या महिलांचा प्रेक्षक वर्ग वाढलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत काम करणाऱ्या लोककला विद्यापीठाने याविषयी शास्त्रशुद्ध शिक्षण देणे सुरु केले आहे.

त्यामुळे अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी घडवले जात आहेत. तसेच दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' मधील विद्यार्थ्यांना सुद्धा त्याविषयीचे मार्गदर्शन केले जात आहे. लावणीची महती ही वाढलेली आहे. त्याविषयीचे शास्त्रशुद्ध, प्राथमिक शिक्षण आपल्या अंगी असावे असे युवतींना, महिलांना वाटायला लागलेले आहे. त्यामुळे गेल्या वर्षापासून सांस्कृतिक क्षेत्रात घट्ट पाय रोहून असलेल्या **नेहरु सेंटरने** सुद्धा **'लावणी माझी सखी'** या कार्यशाळेचे आयोजन करून या लोककलेला समृद्ध करण्याला प्राधान्य देऊन त्याचा प्रचार आणि संवर्धन करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. यंदा सुद्धा १९ मे ते २३ मे २०२५ या दरम्यान नेहरु सेंटर येथे पाच दिवसाचे कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ज्या लावणी नृत्यांगनाने लावणीला प्रतिष्ठा मिळवून दिली त्या ज्येष्ठ, प्रतिभावंत लावणी सम्राज्ञीला उद्घाटनाला बोलावले जाणार आहे. एकंदरीत लावणीचा इतिहास आणि त्या संदर्भातले आजची जडणघडण याविषयीचे त्यांचे मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक लाभणार आहे. त्यानंतर दोन दिवस, परंपरेने आलेल्या लावणी विषयी मार्गदर्शन केले जाईल शिवाय लोककलेची आवड असणाऱ्याना सुद्धा स्वतंत्रपणे लावणी नृत्य करता येऊ शकेल याचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक आणि आत्मविश्वास या पहिल्या तीन दिवसात देण्यात येईल. त्यानंतर त्याच कालखंडात कार्यशाळेचे सूत्रसंचालन करणाऱ्या नृत्यांगणाकडून प्रात्यक्षिक आणि २३ तारखेला होणाऱ्या रंगमंच अविष्काराची तयारी करून घेतली जाईल. हा कार्यक्रम फक्त कलाकार, शिबिरार्थींना प्राधान्य देणारा न होता तो व्यवसायिक दृष्टिकोनातून सादर व्हावा यासाठी वादक, गायक यांना निमंत्रित केले जाणार आहे. त्यासाठी संगीत संयोजकाची नेमणूक केली जाते. शिवाय या संपूर्ण कार्यक्रमाची बांधणी वैशिष्ट्यपूर्ण अशा संकल्पनेत आणि दिग्दर्शनात होणार आहे. त्यासाठी व्यावसायिक रंगमंचावरती नावाजलेल्या कलाकारांना निमंत्रित केले जाणार आहे. त्यामुळे सहभागी सर्व शिबिरार्थींना व्यावसायिक कलेचा आनंद घेतल्याचा आनंद मिळेल. गेल्या वर्षीच्या कार्यशाळेत शंभरहून अधिक महिला, पुरुष कलाकारांना एकाच व्यासपीठावरती नृत्य करण्याची संधी नेहरु सेंटरने दिली होती. लोककला आणि लावणी या संदर्भात ज्यांचा अभ्यास आहे. ज्यानी आयुष्यभर ही लावणी जपली अशा तज्ञांना, नृत्यांगनांना या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी बोलावले जाते.

**सोमवार, दिनांक: १९ मे, २०२५ ते शुक्रवार, दिनांक २३ मे २०२५ सायंकाळी ५.०० ते रात्री ८.००** या दरम्यान ही कार्यशाळा होणार आहे. पाहुण्यांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक हे त्याचे स्वरुप आहे.

**समारोप: शनिवार, दिनांक २४ मे २०२५ ला** दुपारी ३.०० वाजता नेहरु सेंटर सभागृह येथे सादरीकरण असेल. प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा, वादक कलाकार आणि अन्य कलाकारांचा सुद्धा यात सहभाग असेल. **वय वर्ष १५ ते ६०** या वयोगटातल्या स्त्री-पुरुषांना या कार्यशाळेत सहभागी होता येईल. **ही कार्यशाळा पूर्णपणे विनामूल्य आहे.** मात्र प्रवेश पूर्व नोंदणी आवश्यक.

**नाव नोंदणी साठी संपर्क:**
**दूरध्वनी:०२२ ४०२४ ५४०० (विस्तारीत क्रमांक:११९)**
**Whatsapp: ९३२४८५७१८६ प्रकाश पवार**

Nehru Centre
Presents

फोटो चिकटविणे

# प्रवेशासाठी अर्ज

## *लावणी माझी सखी* कार्यशाळा

शिबिरार्थीचे नाव : ______________________

संपूर्ण पत्ता / पिनकोड सह : ______________________

______________________

______________________

ईमेल, ______________________

Whatsapp क्रमांक : ______________________

भ्रमणध्वनी क्रमांक : ______________________

जन्मतारीख : ______________________

शैक्षणिक पात्रता : ______________________

कोणत्या नृत्यकला अवगत : ______________________

कोणत्या संस्थेत सहभाग : ______________________

इतर कोणती कला अवगत : ______________________

योगदानाची दखल घेतली आहे का : ______________________

नेहरू सेंटरच्या सर्व अटी मला मान्य आहेत. माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा ही विनंती.

(सहभागी शिबिरार्थीची स्वाक्षरी)

तारीख:

ठिकाण :